पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १३/१२/२०१९

## जादु टोणा केल्याच्या संशयावरुन जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस आजीवन कारावास व ५,०००/- रुपये दंड

=> जिल्हा सत्र न्यायाधीश, गडचिरोली श्री. स्वप्नील खटी यांचा न्यायनिर्णय

मौजा लाहेरी येथील फिर्यादी नामे गुंडरु बोरगा मडावी व फिर्यादीची पत्नी नामे पाली गुंडरु मडावी यांनी आरोपी नामे सरजु बुकलु बोगामी वय २४ वर्ष रा. लाहेरी ता. भामरागड जि. गडचिरोली याचेवर जादु टोणा केल्याने आरोपी हा बिमार पडल्याचे कारणावरुन फिर्यादी व त्याची पत्नीला जिवानिशी ठार मारण्याची धमकी देवुन दिनांक २५/०८/२०१८ रोजी सकाळी फिर्यादी व त्याची पत्नी हे शेतावर गेले असुन फिर्यादी हा शेतालगत जंगलात बैल चारत होता. व फिर्यादीची पत्नी शेतात धानाच्या बांधीत काम करीत असतांना आरोपी हा संधीचा फायदा घेवुन फिर्यादीची पत्नी नामे पाली गुंडरु मडावी यांची चाकुने गळा कापुन खुन केला. व तेथुन आरोपी हा हातात चाकु घेवुन पडत असतांना फिर्यादीने बघीतला.

त्यानंतर आरोपी सरजु बुकलु बोगामी याच्या विरुध्द उप पोस्टे लाहेरी येथे वरील तक्रारावरुन अप.क्र. ०३/२०१८ कलम ३०२ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गन्ह्याचे तपास पोउपनि श्री. शशिकांत लोंढे यांनी तपास पुर्ण करुन आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

सरकार तर्फे फिर्यादी व ईतर साक्षीदारांचे बयाण तसेच सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरुन मा. न्यायालयाने आज दिनांक १३/१२/२०१९ रोजी आरोपी सरजु बुकलु बोगामी याला मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली यांनी कलम ३०२ भादवी मध्ये आजन्म कारावासाची शिक्षा तसेच ५,०००/- रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली.

तसेच सरकार पक्षातर्फे सहा. जिल्हा सरकारी वकील श्री. सचिन कुंभारे व सदर प्रकरणात कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोनि श्री. प्रकाश तुनकलवार यांनी कामकाज पाहीले आहे.